नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :-१९/४/२०१८

**-: परिपत्र :-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये, गुरूवार दि. १९ एप्रिल २०१८ रोजी दुपारी ३-०० ( तीन ) वाजता भरलेल्या माहे एप्रिल २०१८ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्र.१/२५**

संदर्भ - १) मा.मुख्य सभा ठराव क्र. २९७ दि.१६/०९/१९८३.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.२४१७,दि.२३/२/२०१६.
३) मा.मुख्य सभा ठ.क्र.९२६,दि.२१/३/२०१६.
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/९२१ दि.३०/१/२०१८ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४,दि.१०/४/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे शहरातील सर्व गोठेधारकांना मुंढवा केशवनगर येथे स्थलांतरीत होण्याकरीता दि.३१ डिसेंबर २०१८ पर्यंत मुदत देणे आवश्यक आहे व दरम्यानच्या कालावधीमध्ये गोठेधारकांना प्लॉट देणेसाठी खाली नमुद केलेल्या अटी व शर्ती अथवा धोरणास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१.गोठेधारकांकडून खाली नमुद केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणा-या गोठेधारकास क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २०१५ च्या सर्व्हे नुसार जनावरांच्या संख्येप्रमाणे (१० मोठया जनावरास एक प्लॉट अंदाजे २५०० स्वे.फुट) या तत्वावर प्लॉट देणेस,

२. सदर प्लॉटचे शासकीय मुल्यांकनानुसार भोगवटा मुल्य स्विकारण्यास.

३. मध्यवर्ती शहरातील गोठयांच्या संख्ये इतके प्लॉट राखून ठेवून उर्वरित प्लॉट उपनगरातील पात्र गोठेधारकांना वाटप करणेस,

४. मध्यवर्ती शहरातील गोठे मुंढवा-केशवनगर येथे स्थलांतरीत होण्याच्या दृष्टीने शहरातील गोठे धारकांना दि.३१/१२/२०१८ ही गोठे स्थलांतरीत करण्याकरिता अंतिम तारीख निश्चित करणेस,

५.गोठे स्थलांतरासाठी खालीलप्रमाणे गोठेधारकांची कागदपत्रे ग्राहय धरण्यास.

अ. मा.आरोग्य अधिकारी पुणे महानगरपालिका यांच्या नावे अर्ज.

ब. रेशनींग कार्ड (शिधापत्रिका) ची प्रत.

क. सदर जागेवर सदयःस्थितीत गोठा असल्याचा दिनांक व वेळेसह फोटो व पुणे महानगरपालिकेकडून गोठ्यावर केलेल्या २०१५ पुर्वीचे कारवाईचे कागदपत्रे उदा.मनपा कोर्टातील खटला,सार्वजनिक ठिकाणी घाण केली यासाठी प्रशासकिय शुल्क भरल्याची पावती इ.

ड. महाराष्ट्र शासनाकडील जिल्हा दुग्ध विकास अधिकारी यांचेकडून परवाना अथवा परवाना घेण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.

इ. संबंधीत क्षेत्रिय कार्यालयाकडील आरोग्य निरीक्षक,वरिष्ठ निरीक्षक, प्रमुख आरोग्य निरिक्षक,क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी, महा.सहा.आयुक्त व क्षेत्रिय उपायुक्त यांच्या स्पष्ट अभिप्रायासह स्वाक्षरीचे गोठ्यासाठी जागा देणेबाबत शिफारसपत्र.

६. सरकारी जमिनीवर (नदीपात्र,रस्ता,एसआरए स्कीम इ.) असलेल्या गोठेधारकांचे देखील उपरोक्त अटी व शर्तींची पुर्तता केल्यास मुंढवा-केशवनगर येथे गोठयांसाठी पर्यायी जागा दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने देण्यास.

७. दि.३१/१२/२०१८ पर्यंत मुंढवा केशवनगर येथे स्थलांतरीत न होणा-या गोठे धारकांवर कारवाई करुन तेथील गोठे व्यवसाय बंद करण्यास.

**विषय क्र.२/२६**

संदर्भ - १) मा.स्थायी समिती ठराव क्र. १५१३ दि.३०/१/१९९६
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १४८० दि.३/१२/१९९९
३) मा.मुख्य सभा ठराव क्र. १२५ दि.२४/७/२००२
४) मआ/९६ दि..२५/१/२०११
५) मआ/मुले/१४२८ दि.१६/१०/२०१०
६) मआ/मुले/१७६० दि.४/१२/२०१४

७) सेंट्रल बँक ऑफ इंडिया १८/९/२०१७ चे पत्र (मुले आ.क्र.१/३८१७ दि.१६/९/२०१७)
८) मआ/२६ दि.४/१०/२०१७
९) पीएमपीएमएल/सीएमडी/६३९० दि.१/२/२०१८
१०) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/१२४३ दि.२०/३/२०१८ चे पत्र.
११) मा.स्थायी समिती ठराव क्र.२९,दि.१०/४/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुर्व पीएमटीने बस खरेदीसाठी ओव्हर ड्राफ्टचे माध्यमातुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी पुणे महानगरपालिकेकडून PMPML ला सन २०१७–१८ व २०१८–१९ या वर्षात देय असलेल्या रकमेतून बँक कर्जाची व्याजासहीत थकीत असणारी रक्कम (मुद्दल+व्याज) समायोजित करुन वसूल करणेस, सदरच्या रकमा संबंधित बँकेस आदा करुन पुणे मनपाच्या मुदतठेवी मोकळया करुन घेणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.३/२७</u>

संदर्भ – १) मा.महापालिका सभा ठराव क्र. ४७२ दि.२५/१०/२०१२
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ७७३ दि. २८/८/२०१२
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/१३९० दि.३१/३/२०१८ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४४,दि.१०/४/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

युरोपियन युनियन द्वारा अनुदानित व पुणे महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या श्वास प्रकल्पास मुदतवाढ व या कामकाजासाठी करार तत्वावर, एकवट मानधनावर मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) युरोपियन युनियन व पुणे महानगरपालिकेमार्फत जमा करण्यात आलेल्या रकमेतून पुढील एका आर्थिक वर्ष कालावधीसाठी (माहे मार्च २०१८ ते माहे फेब्रुवारी २०१९ अखेर) सध्याचा श्वास प्रकल्प 'युरोपियन युनियन (EU) प्रकल्प कक्ष' या नावाने कक्ष कार्यान्वित ठेवून प्रकल्पाच्या यापुढे होणाऱ्या खर्चाची रक्कम अदा करणेस.
२) वरील कक्षाचे दैनंदिन कामकाजासाठी करार पध्दतीने एकवट मानधनावर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेस.
३) मा.महापालिका आयुक्त यांचे मंजुरीने त्रयस्थ संस्थेची निवड करुन या संस्थेकडून एण्ड टर्म इव्हॅल्युएशन अहवाल तयार करुन घेणेस व युरोपियन युनियनला सदर अंतिम अहवाल सादर करणेस.

<u>विषय क्र.४/२८</u>

संदर्भ – १) मा.योगेश मुळीक व मा.सौ.श्वेता खोसे–गलांडे यांचे दिनांक ७/१२/२०१७ चे पत्र ,
२) महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.१५९,दिनांक ३/१/२०१८
३) मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ / एच.ओ./१२३८,दि.२०.३.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय.
४)मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. २२१ दि.२८/३/२०१८
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९,दि.१०/४/२०१८

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्याच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून – पुणे मनपाचे येरवडा भागातील राजीव गांधी हॉस्पिटलमध्ये कोठारी डायलसिस सेंटर व पुणे मनपाच्या संयुक्त विद्यमानाने अल्प दरात डायलेसिस सेंटर सुरु करण्यासाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. कोठारी चॅरीटेबल ट्रस्ट वडगाव शेरी १६३ शनिवार पेठ यांचे बरोबर राजीव गांधी रूग्णालय येरवडा येथे पुणे महानगरपालिके बरोबर संयुक्त विद्यमाने डायलेसिस प्रकल्प राबविणेस
२. कोठारी चॅरीटेबल ट्रस्ट वडगाव शेरी यांना डायलेसिस करीता प्रति रूग्ण र.रू ४००/– ( विना कन्झुमेबल ) इतका दर आकारण्यास परवानगी देणेस
३. कोठारी चॅरीटेबल ट्रस्ट वडगाव शेरी यांचेकडून सदरचा डायलेसिस प्रकल्प ५ वर्षे चालविण्याकरीता आवश्यक तो करारनामा करणेस व संयुक्त प्रकल्पात कोणताही प्रश्न उद्भवल्यास किंवा अडचण आल्यास त्या बाबतीत अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

**विषय क्र.५/२९**

संदर्भ – १) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉ.लि. यांचे दि. २८/११/२०१७ चे पत्र. (पा.क्र.२५०)
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/७ दि.५/४/२०१८ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.५१,दि.१०/४/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ कोरेगाव पार्क सि.स.नं. ११/१/क प्लॉट नं. ५ येथील ओरीयन बिल्डींग मधील ऑफिस नं. १०१ ही जागा महाराष्ट्र मेट्रो रेल कॉ.लि. यांना दरमहा भाडे र.रुपये १,२५,०१३/– तसेच इतर शासकीय कर आणि अनामत रक्कम आकारुन पूर्वीची मुदत संपलेल्या दिनांकापासून पुढील ३ वर्षाच्या कालावधीकरिता म्हणजे दि.१/१२/२०१७ ते दि.३०/११/२०२० अखेरपर्यंत भाडेपट्टा कराराने उपलब्ध करुन देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.६/३०**

त्वचारोग तज्ञ, एड्स नोडल ऑफिसर, मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर,कार्डिओलॉजिस्ट/हृद्यरोग तज्ञ, न्यायवैंद्यकशास्त्र तज्ञ/वैंद्यकिय अधिकारी (न्यायवैंद्यकशास्त्र), नेत्र शल्यचिकित्सक/नेत्रतज्ञ, रक्त संक्रमण अधिकारी (वर्ग–१) ( वेतनश्रेणी – १५६००–३९१००+ ग्रेड पे ६६००) या पदावरील नेमणूकीबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सा.प्र. /०१, दि.२/४/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.७/३१**

संदर्भ – १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/सविवि/१९९ दि.२१/७/२०१७
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.६१० दि.१६/८/२०१७
३) मा. पक्षनेते सभा दि. ७/२/२०१८ चा निर्णय
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.६५,दि.१७/४/२०१८

----

**मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्र अवलोकन केले तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –**

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या योजनांबाबत विधवा महिलांच्या अनुदानात र.रुपये ५,०००/– वाढ करुन र.रुपये १५,०००/– अनुदान देण्यात यावे व उर्वरित रक्कम शहरी गरीब आरोग्य योजनेकडे वर्ग करण्यात यावी तसेच मआ/सविवि/१९९ दि.२१/७/२०१७ चा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.८/३२**

संदर्भ – १)मा.मुख्य सभा ठराव क्रमांक १६४ दि.०८/०६/२०१६
२) मा.मुख्य सभा ठराव क्रमांक ४४४ दि.३०/१०/२०१७
३) आरोग्य कार्यालय आवक क्रमांक एच.आय.१०८४२ दि.२१/०२/२०१८
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६ दि.५/४/२०१८ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.७१,दि.१७/४/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

आर्थिक वर्ष २०१८–१९ मध्ये पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी व सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त सेवकांसाठी अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना पुणे म.न.पा. आरोग्य विभागामार्फत खालील बाबींनुसार राबविणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**१)** पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड यांनी आर्थिक वर्ष २०१८–१९ मध्ये, त्रैमासिक रक्कम रुपये१,५०,००,०००/– प्रमाणे एकूण रक्कम रुपये ६,००,००,०००/– अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेचे सभासदत्व घेतलेल्या महामंडळाकडील सर्व कर्मचाऱ्यांसाठी, पुणे म.न.पा. आरोग्य खात्यामार्फत सी.जी.एच.एस. मान्य दराने राबविल्या जाणाऱ्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेसाठी होणाऱ्या खर्चापोटी, पुणे महानगरपालिकेकडे जमा करणे व सदर रक्कम संबंधित योजना राबविणेसाठी खर्च करणेस.

**२)** पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील निवृत्त सेवकांपैकी ज्या सेवकांना पेन्शन लागू आहे, अशा सेवानिवृत्त सेवकांना पुणे म.न.पा.च्या धर्तीवर अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना लागू करण्यास तसेच महामंडळाकडील जे सेवक निवृत्त झालेले आहेत किंवा होणार आहेत अशा सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त सेवकांना वैद्यकीय सहाय्य योजना लागू करण्यास व या सेवकांची वर्गणी निश्चित करताना कल्पीत पेन्शन वेतन निश्चित करण्यास व त्या वेतन वैद्यकीय सहाय्य योजनेच्या नियमानुसार वर्गणी निश्चित करण्यास,त्याप्रमाणे खात्याचा हिस्सा देखील ठरलेल्या धोरणानुसार देण्यास, सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त सेवकांनी कल्पीत पेन्शन योजनेत निश्चित झालेली वैद्यकीय सहाय्य योजनेची वर्गणी आर्थिक वर्षाच्या सुरवातीस महामंडळाकडे जमा करण्यास व सदरची योजना ऐच्छिक स्वरूपात राबविण्यास.

**<u>विषय क्र.९/३३</u>**

संदर्भ – १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/एफएमओ/१४ दि.१३/४/२०१८ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३,दि.१७/४/२०१८

----

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

चंदननगर खराडी भाजी मार्केट येथील दैनंदिन पास फी वसुलीचा मक्ता सन २०१३–१४ साठी र.रु.२४,५०,०००/–,सन २०१४–१५ साठी र.रु.२७,२५,०००/–,व सन२०१५–१६ साठी र.रु.३१,३०,०००/– एवढया रकमेने तीन वर्षाकरिता देण्यात आला होता,सदरहू पास फी मक्ता दि.३१/१०/२०१६ रोजी संपुष्टात आला असल्यामुळे निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत पुर्वीच्याच ठेकेदारास मुदतवाढ देणेत आली आहे,सन २०१७ ते २०२० या तीन वर्षासाठी पास फी करीता दि.२७/१२/२०१७ रोजी जाहीरात दिली होती पुरेशी स्पर्धा न झाल्याने दि.१६/१/२०१८ रोजी मुदतवाढ दिली असता तीन निविदा प्राप्त झाल्या असून अनुक्रमे १) मे. सायन व्हिजिलेन्ट सर्व्हिसेस प्रा.लि.,२) मे.मंगेश एंटरप्रायजेस, पुणे , ३) मे.नवनाथ जगन्नाथ गायकवाड त्यापैकी निविदेमधील अटी व शर्ती प्रमाणे दोन निविदा पात्र झाल्या आहेत. त्यांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे.

<u>तुलनात्मक तक्ता</u>

| अ.क्र. | निविदादाराचे नाव | सन | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | सायन व्हिजिलेन्ट सर्व्हिसेस प्रा.लि.<br>वर्ल्ड ट्रेड सेंटर,टॉवर–२,८०८ इऑन,आयटी पार्क जवळ,<br>खराडी, पुणे –१४ | प्रथम वर्ष<br>द्वितीय वर्ष<br>तृतीय वर्ष | ५०,५१,११५/–<br>५६,५७,२४८/–<br>६५,०५,८३६/– |
| २ | मंगेश एंटरप्रायजेस<br>स.नं.५०/१, दिनकर पठारे नगर,नियर शहा मार्केट,चंदननगर ,<br>पुणे –१४ | प्रथम वर्ष<br>द्वितीय वर्ष<br>तृतीय वर्ष | ४५,०२,६००/–<br>५६,०१,०००/–<br>५८,००,०००/– |

वरील तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केल्यानंतर मे.सायन व्हिजिलेन्ट सर्व्हिसेस प्रा.लि.,पुणे यांनी मनपास देवू केलेली सन २०१७–१८ साठी वार्षिक रक्कम रुपये ५०,५१,११५/– , सन २०१८–१९ साठी वार्षिक रक्कम रुपये५६,५७,२४८/–, व सन २०१९–२०२० साठी रक्कम रुपये ६५,०५,८३६/– ही रक्कम मे.मंगेश एंटरप्रायजेस ,पुणे यांच्या रकमेपेक्षा जास्त आहे.तथापी ठेकेदाराने दिलेल्या वार्षीक रक्कमेनुसार सन २०१७–२०१८ हे आर्थिक वर्षे संपुष्ठत आले आहे.तथापी सन २०१८–१९ या आर्थिक वर्षाच्या शिघ्रसिध्द गणक व सन २०१७–१८ या वर्षाचा शिघ्रसिध्द गणकामधील दरामध्ये बदल झाला नसल्याने ठेकेदारास त्याने नमूद केलेल्या उपरोक्त दरानुसार ताबा दिंनाका पासुन पुढील तीन वर्षा साठी दिल्यास ठेकेदारास निविदे प्रमाणे संपूर्ण ३ वर्षाचा कालावधी मिळू शकतो.त्यामुळे सन २०१७–१८ ऐवजी प्रथम वर्षे,सन २०१८–१९ ऐवजी द्वितीय वर्ष व सन २०१९–२०२० ऐवजी तृतीय वर्षे असे ग्रृहीत धरता येईल. तसेच म.न.पा. ने निर्धारीत केलेली रक्कम रू ३५,०५,६००/– पेक्षा निविदादाराने देऊ केलेली रक्कम कितीतरी अधिक असल्याने यात म.न.पा. चे नुकसान होत नसल्याने चंदननगर खराडी भाजी मंडईचा दैनंदिन पास फी वसूलीचा मक्ता उपरोक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार कमाल रक्कम देवू करणारे मक्तेदार मे.सायन व्हिजिलेन्ट सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे,यांना ताबा दिंनाका पासून तीन वर्षासाठी देणेस व त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र.१०/३४</u>**

संदर्भ – १) ग्रामपंचायत करंजविहिरे ता.खेड मासिक सभा ठराव क्र. २०१ दि.२२/१/२०१८

२) मा.सरपंच, ग्रामपंचायत करंजविहिरे ता.खेड, जिल्हा पुणे यांचे दि.३१/१/२०१८ रोजीचे पत्र.

३) मा.मुख्य सभा ठराव क्र. ८ दि.२१/४/२०१७

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापू/१५ दि.१६/४/२०१८ चे पत्र.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४,दि.१७/४/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

भामा आसखेड प्रकल्पाअंतर्गत करंजविहिरे ग्रामपंचायत ता.खेड येथे ग्रामपंचायतीच्या मागणीप्रमाणे कॉंक्रीट रस्ता बनविणेसाठी खालील बाबीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे

१) भामा आसखेड प्रकल्पाअंतर्गत करंजविहिरे ग्रामपंचायत येथे ग्रामपंचायतीच्या मागणीप्रमाणे कॉंक्रीट रस्ते करणे या विकास कामासाठी र.रुपये ९.९२ लक्ष रक्कम धनादेश/डिमांडड्राफ्टद्वारे ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यास.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका.**